सहसंचालक आरोग्य सेवा (...)
पुणे-१.
का. प.
दिनांक- 28 JUL 1992

महाराष्ट्र राज्य सेवा (वै.दे.) नियम १९६१.

नियम २(३)(एक)(सात)
पती अथवा पत्नी सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवेत असलेल्या पती अथवा पत्नीवर अवलंबित असल्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.एमएजी-१०९२/१६७७/सीआर-२२९/आरोग्य-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 23 जुलै, १९९२.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील नियम २(३) मध्ये "कुटुंबाची" व्याख्या देण्यात आली आहे. या व्याख्येत नियम २(३)(एक)मधील तरतुदीनुसार पती किंवा पत्नी यांचा कुटुंबाच्या व्याख्येत अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

२. पती किंवा पत्नी सेवानिवृत्त कर्मचारी असतील तर ते एकमेकांवर अवलंबित आहेत हे समजण्यासाठी प्रस्तुत नियमांमध्ये त्यांच्या उत्पन्नाची मर्यादा विचारात घेण्यासंबंधी विनिर्दिष्ट उल्लेख नसल्यामुळे त्यांच्याबाबतीत, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील नियम २(३)(सात) मध्ये आई, वडील, घटस्फोटीत बहीण यांच्यासाठी विहीत केलेली उत्पन्नाची मर्यादा लागू होईल किंवा कसे, याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

३. पती व पत्नी यांच्यामधील नातेसंबंध हा इतर नाते संबंधापेक्षा निराळा मानण्यात आला आहे. पती व पत्नी हे एकमेकांचे जोडीदार मानलेले आहेत. हा विशिष्ट नातेसंबंध लक्षात घेता या शासन निर्णयान्वये पती अथवा पत्नी सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवेत असलेल्या पती अथवा पत्नीस आपल्या निवृत्त जोडीदाराच्या वैद्यकीय उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती, तो अथवा ती त्याच्यावर अवलंबित असल्याबाबतचे कोणतेही प्रमाणपत्र सादर न करता, अनुज्ञेय ठरविण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४३१/९२/सेवा-५, दिनांक १० जुलै, १९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( र. शी. पिटे )
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रति,
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस, पुणे.
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परीक्षा) मुंबई/नागपूर
सहसंचालक, अधिदान व लेखा, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती)
चिफ ऑडीटर, लोकल फंडस अकाउंटस, मुंबई (१० प्रती)
कोषागार अधिकारी (सर्व)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई (१० प्रती)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
संचालक, आयुर्वेद, मुंबई.
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायोफार्मासिटीकल कॉर्पोरेशन, मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कु.क.मा.बा.सं.व शा.आ.) पुणे.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व मंडळे)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालये (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
वैद्यकीय रुग्णालयाचे अधीक्षक (सर्व)
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
प्रोथोनटरी व सिनियर मास्टर हायकोर्ट, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
उपमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
सर्व कार्यासने, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व प्रमुखांना सदर शासन निर्णयाच्या प्रती पाठवाव्यात.

प्रत,
निवड नस्ती (महत्वाचे आदेश)/(आरोग्य-७)

बुहेर२२७९२.